# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, लातूर

आमच्या योजनांचा लाभ घ्या!

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, लातूर कार्यालयामार्फत केंद्र व राज्य शासनाच्या विविध आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. आमचा उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला पक्के आणि सुरक्षित घर उपलब्ध करून देणे.

## चालू योजनांची यादी

### केंद्र पुरस्कृत योजना

- प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)

### राज्य पुरस्कृत योजना

- रमाई आवास योजना
- शबरी आवास योजना
- पारधी आवास योजना
- अटल बांधकाम कामगार आवास योजना
- यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना
- मोदी आवास घरकुल योजना
- पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजना

# योजनेची वैशिष्ट्ये व अटी

## योजनेचे स्वरूप

ग्रामीण भागातील बेघर व गरजू व्यक्तींना सुरक्षित, पक्की घरे बांधून देण्याची सुविधा. शासकीय अभिकरणामार्फत घर खरेदीसाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

## घराची किंमत

ग्रामीण क्षेत्रासाठी: ₹ 1,20,000/- पर्यंत

## घराचे क्षेत्रफळ

269 चौ. फूट (चटई क्षेत्र)

## आवश्यक कागदपत्रे

- जातीचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला)
- उत्पन्नाचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला)
- रेशनकार्ड (साक्षांकित प्रत)
- घर बांधण्याच्या जागेची मालकी दर्शविणारी कागदपत्रे (7/12 उतारा / मालमत्ता नोंदणीपत्र / पी.आर. कार्ड / वीज बिल / निवडणूक ओळखपत्र)
- इतर शासकीय योजनांचे ओळखपत्र, बीपीएल कार्ड इत्यादी

## पात्रतेचे निकष

- अर्जदाराचे महाराष्ट्रात किमान 15 वर्षांचे वास्तव्य असावे
- ग्रामीण क्षेत्रासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा: ₹ 1,00,000/-
- स्वतःची जागा किंवा कच्चे घर असणे आवश्यक
- कुटुंबातील फक्त एक सदस्य पात्र
- उपलब्ध जागेवर ग्रुप हाऊसिंग करता येईल
- शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा

## अपात्रतेचे निकष

- चारचाकी वाहन, मोटारबोट असलेली कुटुंबे
- यांत्रिकीकरण केलेली शेती (तीन किंवा चारचाकी साधन वापरणारे)
- नोंदणीकृत बिगर कृषी उपक्रम चालवणारी कुटुंबे
- ₹ 50,000 पेक्षा जास्त मर्यादेचे किसान क्रेडिट कार्डधारक
- सरकारी कर्मचारी असलेली कुटुंबे
- कुटुंबातील कोणीही दरमहा ₹ 10,000 पेक्षा जास्त कमावणारे
- आयकरदाते व व्यावसायिक करदाते
- लँडलाईन फोन, फ्रिज असलेली कुटुंबे
- 2.5 एकरपेक्षा जास्त बागायती जमीन किंवा 7.5 एकर (सिंचित / बिगरसिंचित) जमीन असलेली कुटुंबे

## अधिक माहितीसाठी संपर्क करा!

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, लातूर

👉 आमच्या योजनांचा लाभ घ्या, आपले घरकुल स्वप्न साकार करा!